अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड




www.surajyadigital.com | मंगळवार, दि. २० सप्टेंबर २०२२ ▸ वर्ष : २० वे ▸ अंक : ३५१ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## कपडे धुण्यासाठी गेलेला तरुण पाण्यात बुडाला

**सोलापूर :** कपडे धुण्यासाठी पाकणी येथील सीना नदीच्या बंधाऱ्या जवळ गेले असता तोल जाऊन अशोक भीमराव जाधव (वय ४३ रा रायगाव ता- करमाळा) यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही घटना रविवारी दुपारी १ ते दीड दरम्यान उत्तर तालुक्यातील पाकणी येथे घडली आहे. २४ तास होऊंन गेले असून शोध कार्य चालू असल्याचे पो राठोड, महिंद्रकर यांनी सांगितले आहे. करमाळा येथील अशोक भीमराव जाधव हे खासगी वाहनचालक होते. पुण्यामध्ये वाहनचालकाचे काम करत होते. पाकणी येथील सासरे नागनाथ माने यांच्याकडे पत्नी एक मुलागा व एक मुलगी राहत होते. दसऱ्याच्या निमित्ताने घरातील कपडे पत्नी व मुलीसह स्वछ करीत असताना तोल जाऊन पाण्यात पडून मृत्यू झाला.

# पवारांचा दौरा गाजला, राष्ट्रवादीचा मळा फुलला, धमकीला नाही घाबरले, पाटलांसोबत फिरले

## ▪ निष्ठेच्या कौतुकाने संजयमामाही चमकले

सुराज्य/सोलापूर

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा सोमवारचा सोलापूर जिल्हा भलताच गाजला. आपले नेते येणार म्हटल्यानंतर जिल्ह्यातील सारे नेते व पदाधिकाऱ्यांची कुर्डूवाडीत जणू मांदियाळीच जमली होती. पवारांकडे जसे जाणता राजा म्हणून पाहिले जाते,तसे पॉवरबाज नेता म्हणूनही त्यांची खासियत आहे. समारंभ असो वा पत्रकार परिषद. वेळ प्रसंग पाहून ते टोलेबाजी करत असतात. त्यांचे सोलापूरला येणे म्हणजे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना एकप्रकारे उर्जाच मिळत असते.आज सोलापूर जिल्ह्याच्या राष्ट्रवादीला मरगळ आली आहे,असे म्हटले जाते परंतु येत्या काळात हा जिल्हा राष्ट्रवादीमय होईल, असा विश्वास पवारांनी व्यक्त केल्यामुळे कार्यकर्त्यांना मोठे बळ मिळाले. विशेष म्हणजे कुर्डूवाडीत येण्यापूर्वी त्यांना एक धमकीचा फोन आला. पण त्याला त्यांनी भीक न घालता मोठ्या धाडसाने हा दौरा यशस्वी केला.**

माढा तालुक्याचे पहिले सभापती विठ्ठलराव शिंदे यांच्या पंचायत समितीच्या आवारातील पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरण सोहळा सोमवारी कुर्डूवाडीत पार पडला.त्यावेळी बोलताना पवार यांनी राज्याच्या सद्यस्थितीवर चिंता व्यक्त केली. सोलापूरच्या दौऱ्यात पवारांची प्रेस नाही असे कधीच झाले नाही. त्यांनी पत्रकारांशी मुक्तपणे संवाद साधला. एकेकाळी सोलापूर जिल्हा हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला होता.

पुतळा अनावरण सोहळा सविस्तर वृत्त पान ८ वर

पाटलांची पवारांशी जवळीक विशेष वृत्त पान ३ वर

परंतु आज राष्ट्रवादीच्या बालेकिल्ल्यात राष्ट्रवादीला मरगळ आली आहे, याकडे लक्ष वेधल्यानंतर पवारांचा आत्मविश्वास लगेच जागा झाला. येणाऱ्या काळामध्ये राष्ट्रवादी हा पुन्हा एकदा सोलापूर जिल्ह्याचा बालेकिल्ला असणार आहे. निकाल लागल्यानंतर परत मला तुम्ही सांगा,अशा शब्दात त्यांनी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना ऊर्जा दिली. राज्यातले सध्याचे वातावरण पाहता राजकीय घडामोडींचा परिणाम हा राज्याच्या विकासावर होतोय, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.



### निष्ठा राष्ट्रवादीशीच...

सोलापूरच्या साखर कारखानदारीत पंढरपूरचे उद्योगपती अभिजित पाटील यांचे नाव झळकत आहे.ते भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या बातम्या मध्यंतरी झळकत होत्या.मात्र सोमवारी ते कुर्डूवाडीत पवारांच्या समवेत होते. पवारांनी आपल्या गाडीत अभिजित पाटलांना सोबत घेऊनच कुर्डूवाडीची सफर केल्याचे पहायला मिळाले. त्यामुळे त्यांची निष्ठा राष्ट्रवादीशीच असल्याचे दौऱ्यातून स्पष्ट झाले.

### ग्रामीण विकास ठप्प...

जेव्हा पहिल्यांदा सोलापूर जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची धुरा माझ्यावर सोपवण्यात आली. आणि त्यावेळेस तालुक्याचे माढा तालुक्याचे आमदार हे स्वर्गीय विठ्ठलराव शिंदेच होते. सोलापूर जिल्ह्यात प्रचंड दुष्काळ होता. त्यावेळेस पाच लाख लोकांना रोजगाराची सोय आणि रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून केली. ग्रामपंचायत,पंचायत समिती, किंवा जिल्हा परिषद असो नगरपालिका अशा विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पालकमंत्री पद हे खूप महत्त्वाचे पद आहे. पालकमंत्री पदावरच स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास होतो. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ग्रामीण विकासासाठी पालकमंत्री लवकरात लवकर नियुक्त करणे गरजेचे आहे,या बाबीकडेही पवारांनी लक्ष वेधले.

### राजा मैदानात उतरलाच!

धमकी आली तरी तब्बल ८० वर्षांचा जाणता राजा मैदानात उतरलाच. पवार यांच्या बाबतीत सोमवारी हे घडले. पवारांना कुर्डूवाडी दौऱ्यावर जाऊ नका, असा धमकीचा फोन सकाळी आला, तथापि या धमकीला भीक न घालता 'पॉवर'बाज पवारांनी इथला दौरा केलाच. धमकीचा फोन करणारी व्यक्ती कोण आहे? त्याने ही धमकी का दिली? याची माहिती सध्या समोर येऊ शकलेली नाही, पोलीस त्याची चौकशी करतायेत. पण पवार यांनी धमकीला भीक न घालता आपला नियोजित कुर्डूवाडी दौरा पूर्ण केला. कायम लोकांच्या गराड्यात राहणे ते पसंत करतात. आतापर्यंत अनेक वेळा पवारांना अशा धमक्या आल्या. पण पवारांनी पर्वा न करता किंबहुना धमकीला भीक न घालता आपले नियोजित दौरे पूर्ण केले. तसा आजचा दौराही त्यांनी पूर्ण केला.

### हा बाणा सर्वांनी जपावा


४० ते ४५ जण एकत्र येतात सुरतला, गुवाहाटी, गोव्याला जातात आणि गोव्यातून महाराष्ट्रात येऊन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री शपथ घ्यायला एक महिना लावतात. मंत्रिमंडळ स्थापन करायला ४२ दिवस लावतात



अजून जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या निवडी नाहीत. या महाराष्ट्रामध्ये चाललेय काय? जे गेले ते गेले, त्यांना लखलाभ... अपक्ष आमदार सुद्धा गेले होते त्यांच्याकडे. पण माढा आणि करमाळा तालुका इतका स्वाभिमानी तालुका आहे की, अपक्ष आमदार



असून देखील संजयमामा शिंदे त्यांच्या गळाला लागले नाहीत. हा संजय मामांचा स्वाभिमानी बाणा तो आपण सगळ्यांनी जपला पाहिजे, असे म्हणत धनंजय मुंडे यांनी आमदार संजयमामा शिंदे यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला.





## बेकायदेशीर गाळे बांधकाम प्रकरणी

# जिल्हा परिषदेमध्ये अंगावर डिझेल ओतून पेटवून घेण्याचा प्रयत्न

**सोलापूर :** मोहोळ तालुक्यातील वाफळे येथील सचिन राजू चव्हाण यांनी अंगावर डिझेल ओतून पेटवून घेण्याचा प्रयत्न केला. हा सर्व गोंधळ सीईओ यांच्या कार्यालया समोर घडत असल्याने बघ्यांची मोठी गर्दी जमली होती. अंगावर पेट्रोल अन् हाथात माचिसची काडीपेट्टी असल्याने झेडपीत खळबळ उडाली.

याबाबत सचिन चव्हाण यांनी दिलेल्या माहिती नुसार मोहोळ तालुक्यातील वाफळे येथील स्थानिक पुढारपण करणारे माणिक नलावडे यांनी ग्रामपंचायतीची बेकायदेशीर जागा हडप करून व्यापारी गाळे बांधले. या बेकायदेशीर कामकाजाबाबत आंदोलन करण्यात आले तेव्हा झेडपी प्रशासनाकडून गाळे सील करण्यात आले होते. कोणती ही कायदेशीर परवानगी न घेता माणिक नलावडे यांनी सील तोडून व्यापारी गाळे खुले केले आहेत. यावर कारवाई व्हावी यासाठी सातत्याने प्रयत्न केला. मात्र मोहोळ बीडीओ अन् विस्तारधिकाऱ्यानी याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केल्याचे चव्हाण यांनी सांगितले. सोमवारी सकाळी ११:३० वाजण्याच्या सुमारास त्यांनी सीईओ यांच्या कार्यालया बाहेर पेटवून घेण्याचा प्रयत्न केला. या सर्व घडामोडी नंतर वाफळे येथील गाळयांची संपूर्ण माहिती मागवली आहे. आंदोलनकर्ते सचिन चव्हाण यांना माणिक नलावडे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आश्वासन दिल्याचे सचिन चव्हाण यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. दरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी चव्हाण यांना आपल्या चेंबरमध्ये बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले आणि तातडीने संबंधित अधिकाऱ्याला या प्रकरणात तोडगा काढण्याची सूचना केल्याचे समजले.

# पंढरपूरचा पूर ओसरला

सुराज्य/पंढरपूर

उजनी आणि वीर धरणातून सोडण्यात येणारा पाण्याचा विसर्ग कमी केल्याने पंढरपूरला आलेला पूर आता ओसरू लागला आहे. सध्या उजनीतून ५१६०० क्यूसेक पाणी सोडण्यात येत आहे.

वीर धरणातून ६६०० क्यूसेक पाणी सोडण्यात येत आहे. सध्या पंढरपूर येथे ९०, हजार क्यूसेक पाण्याचा विसर्ग वाहत असून आज सकाळपासून पाणी ओसरू लागले आहे. पुणे जिल्ह्यात पडणारा पाऊस कमी झाला आहे. तसेच भीमा खोरे, पाणलोट क्षेत्रात देखील पाऊस कमी झाल्याने उजनी धरणात येणाऱ्या पाण्याची आवास मंदावली आहे. सध्या दौंड येथून उजनीमध्ये ३५ हजार क्यूसेक पाणी येत आहे. पुराचे पाणी ओसरल्यानंतर शेती आणि घरांच्या पंचनामे करण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.

# यंदाचा ऊस गाळप हंगाम १५ ऑक्टोबरपासून

सुराज्य/सोलापूर

यंदाचा ऊस गाळप हंगाम १५ ऑक्टोबरपासून सुरु होणार आहे. सह्याद्री अतिथीगृहावर सोमवारी पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. बैठकीत राज्यातील ऊस लागवडीचा आढावाही घेण्यात आला.

यंदा ऊसाचं क्षेत्र वाढलं असून साखर उत्पादनात महाराष्ट्र जगात तिसऱ्या क्रमांकावर असल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी सर्वांचं अभिनंदन केलं. तसेच यंदाच्या हंगामासाठी सुमारे १४ लाख ८७ हजार हेक्टरवर ऊस लागवड झाली असून राज्यात ऊस लागवडीचं क्षेत्र वाढलं आहे. यामुळं यंदा सरासरी ९५ टन प्रती हेक्टर ऊस उत्पादन अपेक्षित आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. दरम्यान, या हंगामात सुमारे




२०३ कारखाने सुरू होणार असून यंदा १३८ लाख टन साखर उत्पादन होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. महाराष्ट्राने गेल्या हंगामात १३७.३६ लाख मेट्रिक टन साखर उत्पादन केले असून उत्तर प्रदेश राज्याला मागे टाकलं आहे. यंदाचा गाळप हंगाम सरासरी १६० दिवस अपेक्षित असून यंदा गाळप होणाऱ्या ऊसासाठी १०.२५ टक्के बेसिक उताऱ्यासाठी प्रति मेट्रिक टन ३,०५० रुपये एफआरपी देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला आहे.

# बालाजी मंदिराच्या धर्तीवर पंढरीतील गर्दीचे नियोजन : शंभरकर

▸ जिल्हाधिकारी अहवाल लवकर विभागीय आयुक्तांना पाठवणार

सुराज्य/सोलापूर



आंध्र प्रदेशातील तिरुपती बालाजी मंदिराच्या धर्तीवर पंढरीतील गर्दीचे नियोजन केले जाणार आहे. असे पाहणी वेळी आढळू आले आहे. याबाबतचा शिष्टमंडळाचा पाहणी अहवाल लवकरच विभागीय आयुक्तांना सादर केला जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिली.

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपुरात आषाढी, कार्तिकी, माघवारी या तीन वाऱ्यांना दर्शनासाठी मोठी गर्दी होते. लाखो भाविक पंढरपुरात दाखल होतात. मानाच्या पालखीच्या समवेत येणाऱ्या वारकऱ्यांची संख्या मोठी आहे. लोकांच्या गर्दीचे व रांगेचे नियोजन केले जाते तिरूपती बालाजी मंदिराच्या वतीने मोठ्या प्रमाणात येणाऱ्या भाविकांचे नियोजन कसे केले जाते यासाठी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या नेतृत्वाखली



एक शिष्टमंडळ गेले होते. हे शिष्टमंडळ सोलापुरात परतले आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना विचारणा केली असता जिल्हाधिकारी म्हणाले बालाजी मंदिर परिसरात दर्शनासाठी येणाऱ्या गर्दीच्या नियोजनाचा अभ्यास केला. बालाजी मंदिराप्रमाणे पंढरपुरात काय काय करणे शक्य हे यांचा अभ्यास केला. याबाबतचा सविस्तर अहवाल विभागीय आयुक्त कडे सादर केला जाणार आहे. बालाजी मंदिर प्रशासनाकडून भाविकांना देवस्थानकडून देण्यात सुविधांची प्रत्यक्ष पाहणी देखील करण्यात आली.

दर्शन रांग व्यवस्था, दर्शन रांगेत देण्यात येणाऱ्या सुविधा, गर्दीच्यावेळी करण्यात येणारे नियोजन, भाविकांच्या सुरक्षेसाठी उपलब्ध यंत्रणा, वैद्यकीय सुविधा वाहतूक नियोजन, वाहन व्यवस्था, वाहनतळ व्यवस्था, भोजन व्यवस्था, स्वच्छता, यांचा पाहणी मध्ये समावेश असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिली.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




सगळं शाळेतल्या मुलांकडून करून घेतात, बाकीच्यांच काय ?

कल्याण
455-47-467

मेन बाजार
300-35-258

# महिन्यात उजनी धरणातून सोडण्यात आले तब्बल ९० टीएमसी पाणी

**सोलापूर :** सोलापूरची वरदायनी असलेल्या आणि पाणी साठवण क्षमता १२३ टीएमसी असलेल्या उजनीतून महिनाभरात ९० टीएमसी पाणी सोडण्यात आले आहे. एवढ्या पाण्यात सुमारे ९ लाख एकर शेती भिजू शकते.

महाराष्ट्रातील सर्वात मोठा पाणी साठा असलेले व तिसऱ्या क्रमांकाचे उपयुक्त साठा असलेले पुणे, सोलापूर व अहमदनगर जिल्ह्यांसाठी वरदान ठरलेले उजनी धरण दि. ८ सप्टेंबर रोजी पूर्ण क्षमतेने म्हणजे १११ टक्के भरले होते. त्यानंतर धरणाची पाणी पातळी १०० ते १०८ च्या दरम्यान ठेवून एका महिन्यात धरणाच्या दरवाजातून भीमा नदीपात्रात सोडलेले सुमारे ९० टीएमसी पाणी वाहून गेले आहे. मागील वर्षी उजनी धरण ५ ऑक्टोबर रोजी शंभर टक्के भरले होते. चालू वर्षी मात्र ते २६ ऑगस्ट रोजी शंभर टक्के भरले आहे. धरणाच्या ४२ वर्षांच्या इतिहासात उजनी ३५ वेळा शंभर टक्के भरले आहे. तर २०१८ पासून सलग पाचव्या वर्षी उजनी धरण शंभर टक्के भरले आहे. पुण्यासह राज्यभरात पडणाऱ्या पावसामुळे उजनी धरणात पाणी मोठ्या प्रमाणात येत आहे. त्यामुळे धरणातील पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात सुरू आहे.



# कार्यक्रमासाठी आयुक्त दिल्लीत; शहरात चर्चा मात्र बदलीची

**सोलापूर :** केंद्र सरकारच्या स्वच्छता भारत मिशन शहरी विभागाच्या वतीने आयोजित स्वच्छता स्टार्टअप चॅलेंज अवार्ड कार्यक्रमासाठी मनपा आयुक्त पी. शिवशंकर हे दिल्लीला रवाना झाले आहेत. मात्र दुसरीकडे महापालिकेत त्यांच्या बदलीची चर्चा सुरू झाली आहे.

नवी दिल्ली येथील डॉक्टर आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर येथे मंगळवार दिनांक २० सप्टेंबर रोजी होणाऱ्या कार्यक्रमासाठी आयुक्त सोमवारी दिल्लीला रवाना झाले. या कार्यक्रमात स्वच्छता विषयक उत्कृष्ट कार्य केलेल्या शहराचा पुरस्काराने गौरव केला जाणार आहे. आयुक्त अचानक दिल्लीला रवाना झाल्याचे समजताच महापालिकेच्या अधिकाऱ्यांमध्ये त्यांच्या बदलीची चर्चा सुरू झाली. आयुक्तांनी आंध्रप्रदेशमध्ये त्यांच्या मूळ गावी बदलीसाठी अर्ज केला आहे. मात्र तो अद्याप मंजूर झालेला नाही. गेल्या दोन-तीन महिन्यांपासून आयुक्त पी. शिवशंकर यांच्या बदलीची चर्चा आहे. मात्र ती केवळ चर्चाच राहत आहे. सोमवारी महापालिकेत ठाणे येथील सेल टॅक्स डिपार्टमेंटमधील वैद्य आणि नवीमुंबई नगरपरिषद संचनालयातील उपायुक्त नितीन कापडणीस यांच्या नावाची चर्चा सुरू होती.

